बंजारा शिक्षण संस्था द्वारा संचलित

## कै.बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय, हनेगाव

## ता.देगलूर जि.नांदेड



# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय विचार


## डॉ.मानवते उत्तम हुसनाजी

प्राध्यापक व राज्यशास्त्र विभागप्रमुख

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय विचार

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतातील विविध राजकीय प्रश्नांसंबंधी आणि राजकीय तत्त्वज्ञानासंबंधी मते आपल्या अनेक लेखातून, पुस्तकातून व भाषणातून मांडली आहेत. ते त्यांचे राजकीय विचार आहेत. डॉ.आंबेडकरांचे काही राजकीय विचार त्यांनी घटना परिषदेच्या अधिवेशनातून केलेल्या भाषणातूनसुद्धा व्यक्त झाले आहेत. त्यांच्या विचारांचा तत्कालीन राजकारणावर व स्वातंत्र्यानंतरच्या राजकारणावर प्रभाव पडलेला आहे. डॉ.आंबेडकरांच्या राजकीय विचारात प्रामुख्याने राष्ट्रवाद, स्वराज्य, लोकशाही, मूलभूत हक्क व अल्पसंख्यांकांचे हितरक्षण, समाजवाद व साम्यवाद यासंबंधीचे विचार मोडतात. त्यांचे विश्लेषण खालीलप्रमाणे करता येईल.

## 1) स्वराज्य:

तत्कालीन अनेक राजकीय विचारवंतांप्रमाणेच डॉ.आंबेडकरांनीही स्वराज्यासंबंधी आपले विचार मांडले आहेत. परंतु त्यांचे विचार इतरांपेक्षा वेगळे आहेत. 1905 मध्ये भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसने स्वराज्याची मागणी केली होती. तसेच लोकमान्य टिळकांनी ‘स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच !’ असा मूलमंत्र दिला होता. परंतु लोकमान्य टिळकांना सुद्धा भारताचे वसाहतीचे स्वराज्य हा विचार अभिप्रेत होता. साम्राज्यातील वसाहतीचे स्वराज्य असाच त्याचा अर्थ होता. परंतु डॉ.आंबेडकरांची स्वराज्याची संकल्पना मात्र इतर राजकीय नेत्यांपेक्षा वेगळी होती. ‘स्वराज्य’ हा सर्वांचाच हक्क असला पाहिजे असे त्यांचे मत होते. भारतात स्वराज्य प्रस्थापित होण्यासाठी दलितांचा उद्धार होणे आवश्यक आहे असे त्यांचे मत होते. त्यासाठी उच्च वर्गातील लोकांनी पुढाकार घ्यावा असे मत त्यांनी मांडले.

## 2) राष्ट्रवाद:

डॉ.आंबेडकरांनी राष्ट्रवादासंबंधी संकल्पना मांडताना कॉंग्रेसच्या नेत्यांवर काही आरोप केलेले दिसून येतात. कॉंग्रेसच्या नेत्यांनी खऱ्या अर्थाने भारतीय लोकांमध्ये राष्ट्रवाद रुजविण्याचा प्रयत्न केला नाही. भारतीय नेत्यांनी पददलितांवरील अन्याय दूर करण्याचा प्रयत्न केला नाही. त्यामुळे भारतीय समाजात राष्ट्रीय एकता निर्माण होऊ शकली नाही. भारतात राष्ट्रीय एकता निर्माण करावयाची असेल तर समजातील दलित व मागासवर्गीय लोकांचे कल्याण झाले पाहिजे, असे त्यांनी मत मांडले. या राष्ट्रात स्वातंत्र्य, समता, बंधुभाव या तीन मूल्यांनीच राष्ट्र टिकून राहू शकते, प्रगती करू शकते असाही विचार त्यांनी मांडला. त्यांचा राष्ट्रवाद हा धर्माधिष्ठित नव्हता तर समतावादावर आधारित होता.

## 3) लोकशाही:

डॉ.आंबेडकर लोकशाहीचे कट्टर समर्थक होते. त्यांची लोकशाहीवर नितांत श्रद्धा होती. त्यामुळे त्यांनी भारताची राज्यघटना तयार करीत असताना भारतात लोकशाही प्रस्थापित व्हावी, प्रभावी व्हावी आणि टिकून रहावी या दृष्टीने विचार केला होता.

लोकशाही यशस्वी होण्यासाठी आवश्यक गोष्टी-

1) सामाजिक समता
2) सुसंघटीत व शिस्तबद्ध विरोधी पक्ष
3) समतेची कायदेशीर अंमलबजावणी
4) निवडणूक मुक्त आणि न्याय पद्धतीने व्हाव्यात
5) राज्यघटनेतील नितीदर्शक तत्त्वाचे पालन व्हावे
6) लोकमत जागरूक असावे, लोकांचे प्रभावीपणे शासनसंस्थेवर नियंत्रण असावे.

## 4) मूलभूत हक्क:

डॉ.आंबेडकरांनी मानवी जीवन आणि लोकशाही शासन यांना आवश्यक असणा-या मूलभूत हक्कांचा पुरस्कार केला आहे. म्हणून घटना समितीचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी भारताच्या राज्यघटनेत सर्वच अधिकारांचा समावेश करण्याचा आग्रह धरला. त्यात प्रामुख्याने

1) समतेचा
2) स्वातंत्र्याचा
3) शोषणाविरुद्धचा
4) धार्मिक स्वातंत्र्याचा
5) सांस्कृतिक व शैक्षणिक
6) मालमत्तेचा
7) घटनात्मक उपाययोजनेचा

अशा अनेक महत्त्वपूर्ण हक्कांचा उल्लेख करावा लागेल.

## 5) समाजवादासंबंधी:

डॉ.आंबेडकरांनी समाजवादाचा पुरस्कार केला होता. देशातील समाजवादी व्यवस्था राजकीय तसेच आर्थिक क्षेत्रात लोकशाहीचा स्वीकार करून प्रस्थापित करावी असे त्यांना वाटे. उद्योगधंद्यावर सरकारची मालकी असावी असे त्यांचे मत होते.

## 6) साम्यवादासंबंधी मत:

डॉ.आंबेडकरांनी समाजवादाचा पुरस्कार केला होता त्यामुळे त्यांना साम्यवादाचा विचार अपूर्ण व दोषयुक्त वाटत होता. त्यांनी रशियन व चीनी साम्यवादावर जोरदार टीका केली. त्यांच्या मते, साम्यवादात

1) आर्थिक व भौतिक जीवनाला महत्त्व दिले जाते.

2) साम्यवाद धर्मविरोधी आहे.

3) स्वातंत्र्याचा विरोधक

4) लोकशाहीविरोधी तसेच साम्यवादी राष्ट्रांनी सुद्धा साम्राज्यवादी धोरण स्वीकारून अनेक लहान राष्ट्रांना आपल्या सर्वस्वाखाली ठेवले होते असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात.

## 7) अल्पसंख्यांकांच्या हिताचे रक्षण:

डॉ.आंबेडकरांच्या सर्वच विचारांचा केंद्रबिंदू अल्पसंख्यांकांच्या हिताचे रक्षण करणे हा होता. भारतीय समाजजीवनात अल्पसंख्यांक लोकांवर होणारा अन्याय लक्षात घेऊन त्यांनी अल्पसंख्यांकांच्या हिताच्या रक्षणाचा विचार मांडला. त्यासाठी प्रयत्न देखील केले. त्यासाठी 1924 ला 'बहिष्कृत हितकारिणी सभा' स्थापन केली. 1942 मध्ये 'शेडयुल्ड कास्ट फेडरेशन'ची स्थापना केली. 1931-32 गोलमेज परिषदांमध्ये अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ देण्याची मागणी केली.

अशा प्रकारे त्यांच्या राजकीय विचारांची मांडणी करता येईल.

# धन्यवाद